कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२३–२४/१४६९
दि.०८/१०/ २०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ५५ वी मराठी 'ब' गट नाट्यस्पर्धा दि. ०८ नोव्हेंबर २०२४ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण २१ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने पं. मनोहरबुवा शिरगांवकर नाटयगृहात, रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. ०६ डिसेंबर २०२४ पर्यंत चालणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि. ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी **बनरमेन स्पोटर्स कल्ब, आर्लेम–राय मडगाव** या संस्थेच्या वि. वा शिरवाडकर लिखित **"नटसम्राट"** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. ११ नोव्हेंबर रोजी प्रेमानन्द गज्वी यानी लिहिलेले **"तन–माजोरी"** हे नाटक **कलाकार कला मंच, मयडे–बार्देश** ही संस्था सादर करणार आहे. **माऊली क्रिऐशन, इब्रामपूर–पेडणे** या संस्थेच्या वतीने राजेंद्र नारायण पोळ लिखित **"अंधारगर्भ"** हे नाटक दि. १२ नोव्हेंबर रोजी होईल. मधुसूदन कालेलकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"चांदणे शिंपीत जा"** हे नाटक दि. १४ नोव्हेंबर रोजी **श्रींची इच्छा थिऐटर्स्, हरमल–पेडणे** ही संस्था सादर करेल तर दि. १५ नोव्हेंबर रोजी पु. भा. भावे यांनी लिहिलेले व विकास कांदोळकर यांनी रुपांतरीत केलेले **"महाराणी पद्‌मिनी"** हे नाटक **रवळनाथ युनीटी स्पोर्टस् ॲण्ड कल्चरल कल्ब, तळर्ण–पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. दि.१८ नोव्हेंबर रोजी किशोर आरोसकर यांच्या लेखणीतून उतरलेले **"शिवपुत्र शंभु"** या नाटकाचा प्रयोग **ॐ कलासृष्टी, बांदोडा–फोंडा** ही संस्था सादर करणार आहे.

**होमकुंड रंगभुमी, मडकई–फोंडा** ही संस्था डॉ. मधू आपटे यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **"प्यादी झाली, फर्जंद"** हे नाटक दि.१९ नोव्हेंबर रोजी सादर करेल. **देवताई कला क्रिएशन, मडकई–फोंडा** ही संस्था मामा वरेरकर यांनी लिहिलेल्या व विष्णू सुर्या वाघ यांनी पुनर्लेखन केलेले **"करीन ती पूर्व"** हे नाटक दि.२० नोव्हेंबर रोजी सादर करेल. दि. २१ नोव्हेंबर रोजी मिलींद बर्वे यानी लिहिलेले **"देवा म्हाराजा"** हे नाटक **श्री विठ्ठल मंच सांगाती, कारापूर, तिस्क–साखळी** ही संस्था सादर करणार आहे. **कलासंगम, हेडलॅड सडा–मुरगांव** या संस्थेच्या वतीने प्रभाकर लक्ष्मण मयेकर लिखित **"पांडगो इलो रे बा इलो"** हे नाटक दि. २२ नोव्हेंबर रोजी होईल. दशरथ मांद्रेकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"इमॉटल्"** हे नाटक दि. २५ नोव्हेंबर रोजी **वेदांत एंटटेनमेंट, वाळपई** ही संस्था सादर करेल तर दि. २६ नोव्हेंबर रोजी प्रसाद सातवळेकर यांनी लिहिलेले व प्रसाद कळंगुटकर यांनी रुपांतरीत केलेले **"ओपन ॲण्ड शट!"** हे नाटक **युवक कला मंच, पिळगांव–डिचोली** ही संस्था सादर करणार आहे.

दि.२७ नोव्हेंबर रोजी **श्री पांडुरंग प्रासादिक नाटय मंडळ, विठ्ठलापूर-सांखळी** या संस्थेच्या जयवंत दळवी लिखित “**संसारगाथा**” हे नाटक सादर करणार असून दि. २८ नोव्हेंबर रोजी जयवंत दळवी यानी लिहिलेले “**बॅरिस्टर**” हे नाटक **कालिका थिएटर्स, कळंगुट-बार्देश** ही संस्था सादर करणार आहे. **अर्पण क्रिएशन्स, मडगांव** या संस्थेच्या वतीने हर्षला बोरकर लिखित “**द अदर साइड**” हे नाटक दि.२९ नोव्हेंबर रोजी होईल. प्रा. प्रकाश वजरीकर यांच्या लेखणीतून साकार झालेले “**बुरुज ढासळताना**” हे नाटक दि. ३० नोव्हेंबर रोजी **दि हाऊसिंग बोर्ड कॉलनी रेसिडेन्स असोसिएशन, हरवळे-साखळी** ही संस्था सादर करेल तर दि. ०२ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. नरेश नाईक यांनी लिहिलेल्या “**ना-त्याची गोष्ट**” या नाटकाचा प्रयोग **कण्व क्रिएशन, श्रीस्थळ, काणकोण** ही संस्था सादर करणार आहे. दि.३ डिसेंबर रोजी महाबळेश्वर रेडकर यांच्या लेखणीतून साकार झालेले “**तो मृत्युंजय एक**” हे नाटक **श्री देवी भगवती क्रिडा आणि सांस्कृतिक मंडळ, पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. **चौरंग, नागेशी, बांदिवडे-फोंडा** या संस्थेने कै. वासुदेव वा. खरे यांनी लिहिलेल्या व प्रा. विजयानंद वि. नागेशकर यांनी अनुसर्जन केलेल्या “**शिवसंभव**” या नाटकाचा प्रयोग दि.४ डिसेंबर रोजी सादर होईल. दि.५ डिसेंबर रोजी शेखर ताम्हाणे यांच्या लेखणीतून उतरलेल्या “**सविता दामोदर परांजपे**” या नाटकाचा प्रयोग **नागेश कला मंच, नागेशी, बांदोडा** ही संस्था सादर करणार आहे. दि.०६ डिसेंबर रोजी स्पर्धेचा समारोप **सांस्कृतिक कला मंच, सांगे** या संस्थेच्या केदार देसाई यांनी लिहिलेले “**बाकी शून्य**” या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून प्रवेशिका प्रत्येक नाटयप्रयोगा दिवशी रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी